साप्ताहिक
वतन की लकीर
गुरूवार दि.27 जून 2024

# विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम
# विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्याबरोबर मिळणार सायबर सुरक्षेचे धडे

**बारामती:** येथील विद्या प्रतिष्ठानचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्याबरोबर सामाजिक, व्यावहारिक अनुभवाबरोबर सायबर सुरक्षेचे धडे मिळणार आहे. या उपक्रमाचे दुसरे वर्ष असून मागील वर्षी केलेल्या कामाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विद्या प्रतिष्ठानचे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय बारामती आणि क्विकहिल फाउंडेशन या दोन संस्थेमध्ये कमवा आणि शिका या उपक्रमाअंतर्गत नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या सामंजस्य करारावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर भरत शिंदे आणि क्विक हिल फाउंडेशनचे समिती यांनी स्वाक्षरी केली.

या उपक्रमाचा उद्देश शिक्षणाबरोबर विद्यार्थ्यांना सामाजिक जागरूकतेमध्ये सक्षमपणे सहभागी करून घेणे आहे. या करारा अंतर्गत चालणाऱ्या या योजनेमध्ये विद्यार्थ्यांना विविध शाळा, महाविद्यालय आणि सार्वजनिक ठिकाणी जाऊन सायबर जागृतीचे काम करावयाचे आहे. दोन्ही संस्था या योजनेच्या यशस्वीतेसाठी वचनबद्ध असणार आहेत. क्विकहिल फाउंडेशन हे सायबर सुरक्षेसाठी ओळखले जाते.

या उपक्रमासाठी महाविद्यालयातील सलमा शेख हे शिक्षक समन्वयक म्हणून काम पाहणार आहेत. शिवानी छेडे, सागर मेरावी, रितेश धापटे, ऋतुजा कळसकर हे विद्यार्थी क्लब मेंबर म्हणून काम पाहणार आहेत.

सदर उपक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भरत शिंदे व उपप्राचार्य डॉ. श्यामराव घाडगे व उपप्राचार्य डॉ. लालासाहेब काशीद, बी.बी.ए (सी.ए.) विभाग प्रमुख महेश पवार, बी.एस.सी.(संगणक शास्त्र) विभाग प्रमुख गजानन जोशी, बीसीए (सायन्स) विभाग प्रमुख किशोर ढाणे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच विशाल शिंदे, अनिल काळोखे, पूनम गुंजवटे, अक्षय भोसले, वैशाली पेंढारकर, कांचन खिरे, अक्षय शिंदे यांनी सहकार्य केले. सदर करारासाठी विद्या प्रतिष्ठान संस्थेच्या विश्वस्त सौ.सुनेत्रा पवार, उपाध्यक्ष ॲड.अशोक प्रभुणे, खजिनदार युगेंद्र पवार, सचिव ॲड.नीलिमा गुजर, डॉ.राजीव शहा, किरण गुजर, मंदार सिकची, रजिस्ट्रार श्रीष कंबोज यांनी महाविद्यालयाचे अभिनंदन केले.